सं. फौ. ख. क्र. २१३/२०२२
दिलीप वि. कविता
नि. क्र. २४ लगत

**दिनांक – २८/०७/२०२५**

**निशाणी ४५ वरील आदेशान्वये शपथेवर उलटतपास आरोपी नं.२ तर्फे विधीज्ञ श्री. पटेल यांचेमार्फत सुरु**

**०१.** माझ्याकडे पॅनकार्ड आहे. मी आयकर भरत नाही. माझे वार्षिक उत्पन्न इतके–इतके आहे असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. माझी आणि आरोपी क्र. २ यांची ओळख जेव्हा आरोपी क्र. १ व २ यांचे लग्न झाले त्यावेळेस झाली होती. आरोपी क्र. १ व २ यांचे लग्न अंदाजे पंधरा ते वीस वर्षांपूर्वी झाले असावे. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हापासून माझे आरोपी क्र. २ सुधीरसोबत बोलणे भाषण सुरु झाले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ सुधीर यांचे मुळ गाव करगणी आहे. मी आरोपी क्र. २ सुधीर यांच्या घरी करगणी येथे एकदाच गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ मुंबई येथे नोकरीनिमीत्त राहतो. मला तारीख सुरु असताना समजले की, आरोपी क्र. २ मुंबई येथे अग्नीशामक दलात कामास आहे.

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व २ हे त्यांच्या मुलासह मुंबई येथे राहण्यास आहेत. मी आरोपी क्र. १ व २ यांच्या घरी एकदाच गेलेलो आहे. साक्षीदार सांगतात की, तेही अगदी सुरवातीला गेलो होतो. सुरवातीला आरोपी क्र. १ व २ हे खारघर येथे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, मिसळ कट्टा हे आरोपी क्र. १ ह्या चालवित होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादीमध्ये आरोपी क्र. २ यांनी पैशाची मागणी केली होती असा मजकूर नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. १ व २ यांना ०२,५०,०००/– रुपये दिले असा दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. साक्षीदार सांगतात की, विश्वासाने दिले होते. माझ्याकडे ०२,५०,०००/– रुपये कसे आले असा दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ व २ यांना कधीही ०२,५०,०००/– रुपये दिले नाहीत. हे म्हणणे खरे

नाही की, मी आरोपींचा बोगस चेक घेऊन, बोगस सही करुन खोटी केस दाखल केली आहे. साक्षीदार सांगतात की, आरोपी क्र १ यांनी सही करुन वादग्रस्त धनादेश मला दिला आहे.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त धनादेशामधील मजकूर मी लिहला आहे. साक्षीदार सांगतात की, आरोपी क्र. १ ने सही करुन धनादेश दिला व रक्कम मला टाकण्यास सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, मला आरोपी क्र २ यांचा करगणी येथील पत्ता माहिती होता, खारघर येथील पत्ता माहिती होता पण मी नोटीस मिसळ कट्टा या पत्त्यावर पाठविली. साक्षीदार सांगतात की, तेथे व्यवसाय करतात हे माहिती होते म्हणून त्या पत्त्यावर नोटीस पाठविली. हे मला सांगता येणार नाही की, निशाणी ३७ लिफाफ्यावर पत्ता लिहलेल्या मजकूराची शाई आणि 'नाकारले' या शे–याची शाई वेगवेगळी आहे किंवा कसे.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, माझे शेत आणि आरोपी क्र. १ यांच्या वडीलांचे शेत जवळ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर आणि आरोपी क्र. १ यांच्या वडीलांचे घर जवळ जवळ आहे. माझ्या शेतापासून आरोपी क्र. १ यांच्या वडीलांचे शेत म्हणजेच काही गुंठे जमीन काही अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरेपी क्र. १ यांच्या वडीलांच्या शेताच्या बांधावरची झाडे मी काढली म्हणून माझा आणि आरेपी क्र. १ यांच्या वडीलांचा वाद झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या कारणावरुन मी मुंबई येथे आरोपी क्र. १ यांच्या हॉटेल मिसळ कट्टयावर जाऊन वाद घाताला होता आणि त्यांना म्हणालो की, तुम्ही माझे पैसे घेतले आहेत ते मला परत करा नाहीतर तुम्हाला सोडणार नाही अशी धमकी दिली होती. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र. १ यांनी माझ्याविरुद्ध खारघर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ व २ यांच्यासोबत असलेल्या संबंधाचा गैरफायदा घेऊन आरोपीकडून वादग्रस्त धनादेश

गैरमार्गाने ताब्यात घेऊन त्यावर खोटा मजकूर नमुद करुन प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ यांचा या व्यवहाराशी, या वादग्रस्त धनादेशाशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त धनादेशावर आरोपी क्र. २ यांची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फिर्यादमधील नमुद मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ सोबत असलेल्या वादामुळे मी प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केली आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.07.28 13:05:51 +0530

दि.२८/०७/२०२५ **( आर. बी. कुलकर्णी )**

आटपाडी. सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग आटपाडी